# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**दहिद बु. व दहिद खुर्द (ता.बुलढाणा) या गावांना जोडणा-या अपघातप्रवण रस्त्याबाबत**

**(१) २८७६५ (२३-१२-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिद बु. व दहिद खुर्द (ता.बुलडाणा) या गावांना जोडणा-या रस्त्यावरील सदोष घाटरस्ता बांधकामामुळे अपघातप्रवण क्षेत्र निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घाट रस्त्यावरील चढाचा कोन तांत्रिक निकषानूसार नसल्यामुळे सदर रस्ता अपघात प्रवण झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून झाले,

(४) असल्यास, सदर रस्ता बांधकामातील तांत्रिक दोष निराकरणासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) व (२) होय, अंशत: खरे आहे.

(३) होय, जिल्हा परिषदेमार्फत सर्वेक्षण करण्यात आले असून ३६० मीटर लांबीची सुधारणा आवश्यक आहे.

(४) सन २०१६-१७ जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत काम अंतर्भूत करुन निधीच्या उपलब्धतेनुसार काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

---

**राधानगरी तालुक्यातील पश्चिम भागातील ई.जी.मा व ग्रामीण रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२) ३४४३३ (१४-०१-२०१६). श्री.प्रकाश अबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राधानगरी तालुक्यातील पश्चिम भागातील म्हासुर्ली, भित्तमवाडी, चौधरीवाडी, आपटाळ, केळोशी, गोतेवाडी, कुरणेवाडी, खामकरवाडी, धामोड येथील ई.जी.मा व ग्रामीण रस्त्यांची दुरवस्था झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हासुर्ली ते बावेली रस्ता प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतुन सन २००२ मध्ये पूर्ण होऊन सुद्धा आजतागायत रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ग्रामीण रस्त्यांची पुनःबांधणी करण्याकरिता ग्रामविकास व सार्वजनिक बांधकाम विभाग आर्थिक निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०६-२०१६) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) सन २०१२-२०१३ मध्ये विशेष दुरुस्ती अंतर्गत सदर रस्त्यावर दुरुस्ती करण्यात आली आहे.
(३) संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी इतकी असून अस्तित्वातील लांबी १९०९५५.२२ कि.मी इतकी आहे. सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या व मानव विकास निर्देशकांच्या प्रमाणात करण्यात येते त्यानुसार कोल्हापूर जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ६५४१.२५ कि.मी. इतकी असून अस्तित्वातील लांबी ५२५०.७९ कि.मी इतकी आहे. कोल्हापूर जिल्हा परिषदेस रस्ते व पूल दुरुस्ती व परिरक्षण या कार्यक्रमांतर्गत सन २०१२-१३ ते २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी एकूण ४१९६.६१ लक्ष, तेराव्या वित्त आयोगाअंतर्गत एकूण रु.६७१.९० लक्ष तर पुरहानी कार्यक्रमासाठी रु.८०४.७० लक्ष असा एकूण रु.५६७३.२१ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

रस्ते लांबीचया प्रमाणात विभागास उपलब्ध होणारा निधी अत्यंत अलप आहे. याउलट शासन स्तरावर प्राप्त होणाऱ्या मागण्या जास्त आहेत. प्रश्नांकित राधानगरी तालुक्यातील रस्त्यांच्या खराब लांबीतील दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून उपलब्ध निधी व निकषास अधिन राहून टप्प्या टप्प्याने प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे प्रयत्न राहतील.

---

**वित्त आयोगाकडून जिल्हा नियोजन मंडळांना ज्या निकषाद्वारे निधीचे वितरण केले जाते त्याच धर्तीवर जिल्हा नियोजन तालुक्याच्या विकासासाठी निधीचे वितरण करण्याबाबत**

**(३) ३५३५४ (२०-०१-२०१६). श्री.प्रकाश अबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामीण रस्ते व इ.जि.मार्ग यासाठी जिल्हा नियोजन मंडळामधून करण्यात येणाऱ्या निधींचे वितरण पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली असल्यामुळे तालुक्यातील एकूण रस्त्यांच्या भौगोलीक विस्ताराप्रमाणे योग्य प्रकारे होत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वित्त आयोगाकडून जिल्हा नियोजन मंडळांना ज्या निकषाद्वारे निधीचे वितरण केले जाते त्याच धर्तीवर जिल्हा नियोजन तालुक्याच्या विकासासाठी निधीचे वितरण करण्याच्या निर्णयाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) जिल्हा वार्षिक योजनेसाठी जिल्ह्यांना निधी वाटप सूत्राच्या आधारे निधी निश्चित करण्यात येतो. मात्र जिल्ह्यांना प्राप्त झालेला निधी जिल्ह्यांतर्गत जिल्हा नियोजन समितीने कसा वाटप करावा या बाबत शासनाचे कोणतेही निकष/सूत्र नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील काही अविकसित क्षेत्रातील दुर्गम भागातील रस्त्यांना प्राधान्याने योजनेत समाविष्ट करण्यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे निकष बदलण्याबाबत**

**(४) ३९७२३ (०४-०५-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील काही अविकसित क्षेत्रातील दुर्गम भागातील रस्त्यांना प्राधान्याने समाविष्ट करण्यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे निकष ठरविताना संपूर्ण जिल्ह्याचे सरासरी दरडोई उत्पन्न विचारात न घेता तालुका निहाय विचारात घ्यावयाची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री व मा. ग्रामविकास मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच दक्षिण रायगड मधील पाली, म्हसळा, तळा, श्रीवर्धन व पोलादपूर या अतिदुर्गम व डोंगराळ भागात दरडोई उत्पन्नाचे प्रमाण अत्यल्प आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विभागातील अविकसित क्षेत्रातील दुर्गम भागातील रस्त्यांना प्राधान्याने योजनेत समाविष्ट करण्यासाठी निकष बदलाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत तालुकानिहाय दरडोई उत्पन्न विचारात घेऊन रस्त्यांच्या लांबीचे उद्दीष्ट निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

---

**आकुर्डे-सुळे (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) या गावादरम्यान धामणी नदीवरील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याच्या दोन्ही बाजूकडील रस्ता अरुंद असल्याबाबत**

**(५) ३९९३५ (२९-०४-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आकुर्डे-सुळे (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) या गावादरम्यान धामणी नदीवरील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याच्या दोन्ही बाजूकडील रस्ता अरुंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहतुकीच्या दृष्टीने संरक्षक कठडा नसल्याने हा बंधारा अतिशय धोकादायक बनला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संरक्षक कठडा बांधण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात ये आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

रस्ते विकाय योजना सन २००१-२०२१ नुसार सुळे ते आकुर्डे हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र. ४८ दर्जाचा असून सुस्थितीत आहे. सदर रस्त्याच्या ०/६०० कि.मी. मध्ये प्रश्नांकित बंधारा येतो. सदर बंधाऱ्याच्या दोन्ही बाजूस असणारा ग्रामा.क्र.४८ सुस्थितीत असून ३.७५ मी रुंदीचा आहे. रस्ते निकषानुसार ग्रामीण मार्गाची रुंदी किमान ३ मी. असणे जरुरीचे आहे. त्याप्रमाणे सदर रस्ता अरुंद नाही.

(२) ते (४) कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यास गार्ड स्टोन बसविण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे सदर कोल्हापूर पध्दतीचा बंधारा सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी निषिध्द आहे.

बंधाऱ्यावरील रस्त्यांचा वापर फक्त बंधारा देखभाल दुरुस्तीसाठी करण्यात येतो. त्यामुळे बंधाऱ्यावर कोठेही कठडे बांधणेत आलेले नाहीत. तसेच सदर बंधारा पूरात बुडणारा असल्याने पूर प्रवाहास अडथळा होवू नये यासाठी कठडे बांधण्यात येत नाहीत, असे जलसंपादा विभागाने कळविले आहे.

---

**पन्हाळा (जि.कोल्हापूर) येथे National Optical Fibre Network प्रकल्पातून फायबर केबल जोडणीचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(६) ३९९५४ (०५-०५-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने National Optical Fibre Network या योजनेद्वारे देशातील सर्व ग्रामपंचायातीना ऑप्टिकल फायबर केबल नेटवर्क मधून ब्रॉड ब्यांड इंटरनेट कनेक्शन देण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेसाठी तालुक्यातील काही ठिकाणी भूमिगत OFC केबल टाकण्याचे काम केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेसाठी पन्हाळा तालुक्यातील प्रजीमा १७ पासून तिरपन, कोलोली, करंजफेण, बांदिवडे रस्ता इजिमा २१ रस्त्याच्या बाजूस भूमिगत OFC केबल टाकण्यासाठी संबंधित ठेकेदाराने बाजूपट्टी खोदाईचे काम केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खोदाईचे केल्यामुळे व त्या व्यवस्थित न बुजविल्यामुळे रस्त्याच्या बाजूपट्टीस धोका निर्माण झाला असून ग्रामस्थांची व वाहनांची गैरसोय होत आहे व काही ठिकाणी अपघातांचे प्रकार घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरचे निकृष्ट काम तात्काळ थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व सदर प्रकरणी संबंधित ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

केंद्र शासनाने कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा, गडहिंग्लज, हातकणंगले, कागल, करवील, पन्हाळा, राधानगरी, शिरोळ या ८ तालुक्यामध्ये ऑप्टीकल फायबर केबल नेटवर्क मधून ब्रॉड बॅड इंटदरनेट कनेक्शन देण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) रस्त्याची बाजूपट्टी खुदाई केल्यामुळे व त्या व्यवस्थित न बुजविल्यामुळे रस्त्याच्या बाजूपट्टीस धोका निर्माण झाला व याबाबत प्रस्तुत कामासाठी रस्त्याचे नुकसान झाल्यास ते दुरुस्त करण्याची जबाबदारी भारत संचार निगम लि.कोल्हापूर यांची आहे. याप्रकरणी रस्त्याच्या बाजुपट्ट्यास दबाई रोलिंग केलेले नसल्यामुळे सदर रस्ता पुर्ववत करण्याबाबत भारत संचार निगम लि. (BBNL) कोल्हापूर यांना उचित कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इंदिरा आवास योजनेची कामे राज्यात असमाधानकारक असल्याबाबत

**(७) ३९९८८ (०६-०५-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या इंदिरा आवास योजनेच्या अंमलबजावणीमध्ये जिल्हा व तालुकास्तरावर कमालीची शिथिलता व दुर्लक्ष होत असल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिवांनी घेतलेल्या जिल्हानिहाय खर्चाचा आढावा बैठकीत निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त योजनेची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) होय.

(२) प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांनी दि.३१.१२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये सर्व विभागीय आयुक्त यांना घरकुलाचे काम विहीत कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

घरकुल योजनांची अंमबजावणी / संनियंत्रणासाठी शासन निर्णय क्रमांक इंआयो-२०१५/प्र.क्र.४१३/ योजना -१० दि. १० फेब्रुवारी २०१६ रोजीच्या अन्वये राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण या कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

दि. १६.०२.२०१६ , दि.०४.०३.२०१६, दि. ०८.०३.२०१६ व दि.१७.०३.२०१६ या रोजी व्हिडीओ कान्फरसद्वारे योजनेचा वेळोवेळी आढावा घेतला आहे. तसेच संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांनी क्षेत्रीय स्तरावर वेळोवेळी भेटी देऊन कामाच्या वस्तुस्थितीचा आढावा घेतला आहे.

परिणामस्वरुप दि.३१.०३.२०१६ रोजी १,५७,२६० घरकुलापैकी १,४६,९१९ म्हणजेच ९३% घरकुलांना मंजूरी देण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे. तसेच PFMS प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यात रु.३८९.४९ कोटी वर्ग करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुरार ग्रामपंचायत (ता.माणगाव, जि.रायगड) हद्दीतील घरकुल न बांधता रक्कमेचा अपहार केल्याबाबत**

**(८) ४०९६५ (०४-०५-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुरार ग्रामपंचायत (ता.माणगाव, जि.रायगड) हद्दीतील घरकुल योजनेंतर्गत श्री.अय्याज महम्मद अली पोटे रा. पूरार यांनी घरकुल न बांधता दिनांक ५ नोव्हेंबर, २०१४ रोजी धनादेश क्र.८३७१८२ अन्वये रु.३५,०००/- रक्कम स्वीकारली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपूर्ण बांधकाम असतानाही धनादेश देणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध तसेच लाभार्थीविरुद्ध काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) होय.
श्री.अय्याज महम्मद अली पोटे यांना दि.०७/१२/२०१३ रोजी घरकुल बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.
सदर लाभार्थ्यांने बँक खाते क्रमांक उशीरा सादर केल्यामुळे पहिला हप्ता व दुसरा हप्ता बांधकाम सुरु झाल्यावर दि.२९/०३/२०१४ रोजीअदा करण्यात आला आहे. लाभार्थ्यांने छप्पर काम पूर्ण करुन प्लास्टरचे काम शिल्लक ठेवले होते. तसेच लाभार्थ्यांचे शौचालयाचे काम अपूर्ण असतानादेखील सदर लाभार्थ्यास तिसरा हप्ता दि. २३.०५.२०१६ रोजी अदा करण्यात आला आहे.
(२) घरकुल लाभार्थ्यास हप्ता वर्ग् करणेबाबत अनियमितता झाली त्याबाबत कनिष्ठ लेखाधिकारी व कनिष्ठ सहायक, पंचायत समिती, माणगाव यांना नोटीसा देण्यात आल्या आहेत. तसेच अपूर्ण घरकुल बांधकामाबाबत ग्रामसेवक व लाभार्थ्याला नोटीस देण्यात आली आहे. सद्य:स्थितीत घरकुलाचे काम पूर्ण झाले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करंजघर (ता.सुधागड, जि.रायगड) येथील घरकुल योजनेंतर्गत झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(९) ४०९९८ (०५-०५-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खवली (ता.सुधागड, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील करंजघर येथील एकाच कुटूंबातील व्यक्तीने २ घरकुलांचा लाभ घेतल्याने पाली पंचायत समिती समोर उपोषण करण्यात आले असतानाही माहे जानेवारी, २०१६ पर्यंत लाभार्थी विरूध्द कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकाच लाभार्थ्याला दोन घरकुलांचा लाभ देणाऱ्या अधिकाऱ्यावर व संबंधित लाभार्थीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) होय.
(२) उक्त प्रकरणी पंचायत समिती सुधागड पाली मार्फत चौकशी करण्यात आली असून चौकशीत तत्कालीन सरपंच, श्रीमती सुलभा गणपत पवार व त्यांचे पती श्री गणपत काशीनाथ पवार या दोघांनी इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरकुलाचा लाभ घेतल्याने निष्पन्न झाले आहे.

तत्कालीन सरपंच, श्रीमती सुलभा गणपत पवार यांचेविरुध्द महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ३९(१) अन्वये कार्यवाहीचा प्रस्ताव जिल्हा परिषदकडे सादर करण्यात आला होता मात्र सरपंच यांचेविरुध्द दि. २३.११.२०१५ रोजी अविश्वास ठराव मंजूर झालेला असून त्यांना पदावरुन बाद करण्यात आले आहे तसेच ग्रामपंचायत सहसत्व रद्द करणेबाबत पाली पंचायत समितीने जिल्हा परिषदेकडे प्रस्ताव सादर केला आहे. दुबार घरकुलास मंजूरी देणाऱ्या ग्रामसेवकाकडून रुपये ९३,५००/- वसूल करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अपंगांसाठी वाटप करण्यात येणाऱ्या झेरॉक्स मशीन एक वर्ष होवून गेले तरी वाटप केल्या नसल्याबाबत**

**(१०) ४११६५ (२८-०४-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंचायत समितीच्या माढा रोड कुर्डुवाडी (जि.सोलापूर) येथील कार्यालयात समाजकल्याण महिला व बालकल्याण विभागाकडून अपंगांसाठी वाटप करण्यात येणाऱ्या झेरॉक्स मशीन एक वर्ष होऊन गेले तरी वाटप न केल्यामुळे पडून आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपंगांना झेरॉक्स मशीन वाटप न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती संबंधीत जबाबदार अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) योजनेच्या अटी व शर्तीनुसार अपंग लाभार्थ्यांना त्यांचे विहीत कागदपत्रे सादर करण्यासाठी आव्हान करुनही अशी कागदपत्रे लाभार्थीकडून प्राप्त न झाल्याने लाभार्थ्यांची अंतिम निवड करता आली नाही. त्यामुळे लाभार्थी निवडीला विलंब झाला.

सद्य:स्थितीत लाभार्थी निवड झालेली असून ५ झेरॉक्स मशीनचे वाटप झालेले आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामीण व डोंगरी भागाकरीता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या निकषांमध्ये बदल करण्याबाबत**

**(११) ४१२३६ (०४-०५-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण भागातील न जोडलेल्या गांवाना तसेच वाड्यावस्त्यांना जोडणेकरीता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेची निर्मीती करण्यात आली आहे काय, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेतंर्गत ग्रामीण भागातील रस्त्यांचा समावेश करण्याकरीता इतर जिल्हा मार्ग या मार्गांना प्राधान्य देवून ग्रामीण भागातील ग्रामीण मार्गांना दुस-या टप्यात प्राधान्य देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डोंगरी व दुर्गम तालुक्यात इतर जिल्हा मार्ग हे कमी प्रमाणात असल्याने तसेच या मार्गांवर राज्याच्या अर्थसंकल्पातून निधी मिळत असल्याने सदरच्या रस्त्यांची कांमे बहुतांशी मार्गी लागली आहेत त्यामुळे ग्रामीण रस्त्यांना मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत प्राधान्यक्रम द्यावे अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या योजनेतंर्गत घालण्यात आलेला निकष बदलण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व अद्यापही निर्णय घेतला नसल्यास निर्णय न घेण्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही.
(३) अशी मागणी प्राप्त नाही.
(४) आजमितीस असा प्रस्ताव नाही.

---

**मौजे दिवशी खुर्द (ता.पाटण, जि.सातारा) याठिकाणी विद्यमान जिल्हा परिषद सदस्या यांनी १३ व्या वित्त आयोगाच्या निधीचा अपव्यय केल्याबाबत**

**(१२) ४१२४० (०६-०५-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दिवशी खुर्द, (ता.पाटण, जि.सातारा) याठिकाणी जिल्हा परिषदेच्या १३ व्या वित्त आयोगामधून रक्कम रु.२.४६ लक्ष चे संरक्षक भिंत विद्यमान जिल्हा परिषद सदस्या यांनी खाजगी जागेत स्वत:च्या घराला संरक्षण देण्याकरीता खर्च केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात संबंधीत गांवातील ग्रामस्थांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे लेखी तक्रार करुन या कामांची उच्चस्तरीय चौकशी करावी अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामस्थांच्या मागणीवरुन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे दिनांक १८ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास या कामासंदर्भात उच्चस्तरीय चौकशी करण्याची पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा परिषद सदस्यांनी स्वमालकीच्या घराभोवती संरक्षक भिंत बांधून शासनाच्या निधीचा अपव्यय करणा-या या कामांची शासनाने चौकशी करुन संबंधितावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

जिल्हा परिषदेच्या १३ वा वित्त आयोगाच्या निधीमधून दिवशी खु.ll ता. पाटण येथे रस्त्याच्या कडेला संरक्षक भिंत बांधकामसाठी रु.२.४६ लाख इतका निधी उपलब्ध करुन दिला हे खरे आहे. तथापि सदर संरक्षक भिंत खाजगी जागेत बांधण्यात आलेली नसून ग्रामपंचायतीच्या रस्त्याच्या कडेस उभारली आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) सदर संरक्षक भिंत संबंधित ग्रामपंचायतीने त्यांच्या दि. २७.२.२०१५ रोजीच्या ठरावानुसार दि. २८.२.२०१५ रोजी मागणी केली असल्याने बांधण्यात आली आहे. या रस्त्याची नोंद ग्रामपंचायतीकडील नमुना नं.२६ ला घेण्यात आली आहे. उच्चस्तरीय चौकशी करण्याच्या मागणीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या चौकशीमध्ये बांधण्यात आलेली संरक्षक भिंत मौजे दिवशी खु.ll गावांतर्गत आरल रस्ता ते ग्रामपंचायत ऑफीस या ग्रामपंचायतीच्या मालकीच्या रस्त्यालगत बांधण्यात आली असून रस्त्याचे भूस्खलनापासून होणारे नुकसान व अडथळा टाळण्याकरीता बांधण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील गावांमध्ये ग्रामसेवकांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(१३) ४१३९६ (०६-०५-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात १ हजार ३० ग्रामपंचायती पैकी ८५० स्वतंत्र ग्रामपंचायती तर १८० ग्रुप ग्रामपंचायती आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यात केवळ ८५० ग्रामसेवक आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनेक ग्रामसेवकांना अन्य गावांचाही कारभार पाहावा लागत असून त्यामुळे नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रिक्त असलेली ग्रामसेवकांची पदे तातडीने भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) होय. कोल्हापूर जिल्ह्यात १०३० ग्रामपंचायती असून त्यापैकी ८९४ स्वतंत्र व १३६ ग्रुप ग्रामपंचायती आहेत.
(२) नाही. जिल्ह्यामध्ये एकूण ७०१ ग्रामसेवक व १८३ ग्रामविकास अधिकारी असे एकूण ८८४ ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी कार्यरत आहेत.
(३) काही ग्रामसेवकांना अन्य ग्रामपंचायतींचा कार्यभार पहावा लागत असला तरी नागरीकांची गैरसोय होणार नाही. याबाबतची दक्षता घेण्यात येते.
(४) व (५) ग्रामविकास अधिकारी संवर्गाची १० पदे व ग्रामसेवक संवर्गाची १६ पदे रिक्त आहेत. डिसेंबर, २०१५ मध्ये जाहिरात देऊन त्यापैकी ग्रामसेवकांची सरळसेवेची ७ पदे भरण्यात आली आहेत. ग्रामविकास अधिकारी संवर्गाची ९ पदे मार्यादीत स्पर्धा परीक्षेद्वारे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

---

**मौजे सुजातपूर (ता.खामगाव, जि.बुलडाणा) हे गाव मुख्य रस्त्याशी जोडण्याबाबत**

**(१४) ४१४६३ (१७-०५-२०१६). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सुजातपूर (ता.खामगाव, जि.बुलडाणा) हे गाव राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ पासून जवळच अंतरावर असून देखील स्वातंत्र्य काळापासून मुख्य रस्त्याशी जोडले गेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०३ सप्टेंबर, २०१५ रोजी संबंधीत विभागाशी पत्र व्यवहार करून हे गाव मुख्य रस्त्याशी जोडण्यात यावे अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्ता करण्याबाबत जिल्हा परिषद, बांधकाम विभाग यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत विशेष बाब म्हणून हे गाव मुख्य रस्त्याशी जोडण्याचे आदेश तात्काळ देण्यासाठी कोणती शासनाने कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) ते (५) नाही. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ज्ञानगंगा प्रकल्पाच्या वितरीकेचा सेवापथ पाटबंधारे विभागाच्या अखत्यारीत असून सेवापथावर काम करण्यास परवानगी मिळणेचा

प्रस्ताव पाटंबधारे विभागाकडे जिल्हा परिषदेने पाठविला असता केवळ ३.२५ मी. माथा रुंदीमध्ये काम करता येईल असे कळविलेले आहे. एवढ्या कमी रुंदीत रस्त्याचे काम होऊ शकत नाही. तसेच कॅनॉलचे लांबी व्यतिरिक्त पुढील वळण लांबीमध्ये दानपत्राद्वारे जमिन उपलब्ध होवू शकत नाही. यास्तव इजिमा-५५ (पिंप्री देशमुख) ते सुजातपुर ग्रा.मा.२९ या साधारणत: १.४०० कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या जमिनीबाबतचे दानपत्र प्राप्त करुन घेण्याचे प्रयत्न जिल्हा परिषदेमार्फत सुरु आहेत.

---

**धुळे जिल्हयाला १४ व्या वित्त आयोगातून जास्त निधी मिळण्याबाबत**

**(१५) ४१५६७ (०५-०५-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयाला ८ महिन्याचा विलंबानंतर १४ व्या वित्त आयोगातून ३९ कोटींचा निधी मिळाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयाचा विचार करता संबंधित निधी कमी असून जास्तीचा निधी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) चौदाव्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत केंद्र शासनाकडून सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचा जनरल बेसिक ग्रॅटला पहिला हप्ता दि.१/७/२०१५ रोजी राज्य शासनास प्राप्त झाला. प्रस्तूत प्राप्त निधी दि. १६/७/२०१५ रोजी सर्व जिल्हा परिषदांकडे वितरीत करण्यात आला असून त्यामध्ये धुळे जिल्ह्याला रु.१९ कोटी ४८ लाख इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

तसेच, जनरल बेसिक ग्रँटचा दुसरा हप्ता केंद्र शासनाकडून दि. २०/१२/२०१५ रोजी राज्य शसनास वितरित करण्यात आला. प्रस्तुत दुसऱ्या हप्त्याची रक्कम ग्रामविकास विभागाकडून दि.३/१२/२०१५ रोजी सर्व जिल्हा परिषदांकडे वितरीत करण्यात आली असून त्यामध्ये धुळे जिल्ह्याला रु. १९ कोटी ४८ लाख इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(२) केंद्रिय वित्त आयोगांतर्गत केंद्र शासनाकडून देण्यात येणाऱ्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्य शासनाकडून अंमलबजावणी होणे आवश्यक असते.

वरीलप्रमाणे चौदाव्या केंद्रिय वित्त आयोगांतर्गत निधी वितरणाबाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन निधीचे वितरण जिल्ह्याची लोकसंख्या (९०%) व क्षेत्रफळ (१०%) यांच्या आधारे करण्याबाबतचा निर्णय राज्य शासनाने घेतला असून त्या निकषाप्रमाणे धुळे जिल्ह्याकरीताचा निधी वितरणाची कार्यवाही ग्रामविकास विभागाकडून करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्हा परिषदेच्या मालमत्त्यामध्ये झालेला गैरव्यवहार

**(१६) ४१५७४ (०४-०५-२०१६). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हा परिषदेच्या एकुण मालमत्तेपैकी काही मालमत्ता खाजगी व्यक्तींच्या नावे असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१५ च्या अखेरीस निदर्शनास आली आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची नेमकी सद्यस्थिती काय आहे,

(३) असल्यास, यातील काही मालमत्तांचे मटेरियल काढून जिल्हा परिषदेच्या परस्पर विकण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(५) असल्यास, दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

जिल्हा निधीतून जिल्हा परिषदेने व गट अनुदानातून पंचायत समितीने किंवा शासनाच्या सहकार्याने करण्यात आलेले प्रस्तुत काम पूर्ण करणे जिल्हा परिषदेची जबाबदारी आहे व ती जिल्हा परिषदेची मालमत्ता आहे. सांगली जिल्हा परिषदेच्या अंतर्गत विविध विभागाच्या ३००२ एवढ्या मालमत्ता आहेत. काही मालमत्तेचे अधिकारी अभिलेखाचे अद्ययावतीकरण न झाल्याचे खाजगी व्यक्तीच्या नावे असल्याचे निदर्शनास आले आहे. प्रस्तुत मालमत्ता जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीमध्ये जिल्हा परिषदेच्या नावे होण्याबाबत ठराव केलेला आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) सदर मालमत्तेचे मटेरियल जिल्हा परिषदेच्या परस्पर विकण्यात आल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पवना नदीवरील गहुंजे साळूंब्रे साकव पूलाची दुरवस्था झाल्याबाबत

**(१७) ४१६४६ (०६-०५-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा- पवन मावळ भागातील पडलेल्या जोरदार पावसामुळे पवना नदीवरील गहुंजे साळूंब्रे साकव पूल ३ ते ४ वेळा पाण्याखाली गेला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळ्यात ४ ते ५ वेळा नदीच्या पाण्याच्या पातळीत अचानक वाढ झाल्याने पुलावरून पाणी वाहत राहून पुलाचा ठिसूळ झालेला भराव वाहून गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विविध ठिकाणावरून येणारे शेतकरी, दुग्ध व्यावसायिक व ग्रामस्थांची मोठी गैरसोय होत असून सर्वांना १० कि.मी. वळसा घालून ये जा करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या ठिकाणी कायमस्वरूपी उंच पूल बांधण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) मावळ तालुक्यातील अतिवृष्टी झाल्यास सदर पूल पाण्याखाली जातो हे खरे आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) जिल्हा नियोजन समितीकडून उपलब्ध होणारा निधी व प्राथम्य क्रमानुसार पवना नदीवरील गहुंजे साळूब्रे पुलाचे बांधकाम करण्याचे नियोजन राहिल.

---

**सोलापूर जिल्ह्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजना राबविण्याबाबत**

**(१८) ४१९८६ (०४-०५-२०१६). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील ५०० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या लोकवस्त्यांना बारमाही रस्त्याने जोडण्याचा मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचा कार्यक्रम हाती घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सोलापूर जिल्ह्यासाठी सन २०१५-१६ साठी किती निधी राखून ठेवला आहे,
(३) असल्यास,या रस्त्याची कामे प्रत्यक्षात केव्हा सुरु करण्यात येणार आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सन २०१५-१६ या वर्षात सोलापूर जिल्ह्यातील ८२.६० कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या दर्जोन्नतीसाठी रु. ४९.७१ कोटी रकमेच्या कामांना मंजूरी देण्यात आलेली आहे.
(३) मंजूर झालेल्या रस्त्यांच्या कामांच्या निविदा प्रक्रिया सुरु असून निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यावर कामांना सुरुवात होईल.

---

**चिखली (जि.बुलडाणा) येथे जिल्हा परिषद बांधकाम विभागातंर्गत ग्रामीण भागात येणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(१९) ४२०५४ (३०-०४-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखली (जि.बुलडाणा) येथे जिल्हा परिषद बांधकाम विभागातंर्गत ग्रामीण भागात येणाऱ्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम गेल्या दहा ते बारा वर्षापासून न झाल्याने रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही. चिखली तालुक्यात इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग दर्जाच्या रस्त्यांची एकूण १९९ कामे करण्यात आली असून सन २००४-०५ ते २०१६-१७ (माहे जून २०१६ पर्यंत) या मागील बारा वर्षाच्या कालावधीत एकूण रु. २१७५.२४ लक्ष इतका खर्च करण्यात आला आहे.

उर्वरित रस्त्यांच्या खराब लांबीतील दुरुस्तीची कामे जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या टप्प्याने प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे अंबवणे (ता.वेल्हे, जि.पुणे) येथील आठवडा**
**बाजार व धान्य बाजार पूर्ववत सुरु करणेबाबत**

**(२०) ४२३८३ (२९-०४-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अंबवणे (ता.वेल्हे, जि.पुणे) येथे यापूर्वी आठवडा बाजार व धान्य बाजार भरत होता परंतु मागील काही वर्षापासून बंद झालेला असल्याने सदर बाजार पूर्ववत सुरु करण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे व उपविभागीय अधिकारी, उपविभाग भोर यांना माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही. मौजे अंबवणे येथील आठवडे बाजार व धान्य बाजार पुर्ववत सुरु होणेबाबत नोव्हेंबर, २०१५ मध्ये व त्या सुमारास निवेदन प्राप्त झालेले नाही.

तथापि, ग्रामपंचायत अंबवणे यांच्या दि. २६/०५/२०१६ रोजीच्या मासिक सभेत ठराव क्र. ७ अन्वये मौजे अंबवणे येथे आठवडे बाजार सुरु होणेबाबत मंजूरी देण्यात आलेली असून, मौजे अंबवणे येथे आठवडे बाजार सुरु करण्याबाबतचे सरपंच, ग्रामपंचायत अंबवणे यांचे दि. ०४/०६/२०१६ रोजीचे निवेदन दि. २२/०६/२०१६ रोजी उपविभागीय अधिकारी, उपविभाग भोर यांचेकडे प्राप्त झाले आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणी नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील पिंगळादेवीच्या गडावरील रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(२१) ४२६९६ (२९-०४-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील पिंगळादेवीच्या गडावरील रस्त्याचे काही ठिकाणी डांबरीकरण करण्यात आले तर काही ठिकाणी काम अपूर्ण असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंगळादेवीच्या गडावर येणाऱ्या भाविकांची गैरसोय होत असल्यामुळे या रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गावठाण हद्दीतील इमारतींना बांधकाम परवानगी देण्याबाबत**

**(२२) ४२८९० (३०-०४-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गावठाण हद्दीतील इमारतींना बांधकाम परवानगी देण्याबाबत शासनाने दि. ११ डिसेंबर, २०१५ रोजी ग्रामविकास विभागाने शासन निर्णय जाहीर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हयातील ग्रामपंचायत हद्दीतील बांधकामांना दिनांक १० फेब्रुवारी, २०१० पासून विभागीय आयुक्त पुणे यांनी एका पत्रकाद्वारे बंदी आणली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक ११ डिसेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार बांधकामाची परवानगी देण्यासाठी तालुका स्तरावर पंचायत समितीत आणि जिल्हा स्तरावर जिल्हा परिषदेत नगररचना अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येणार असल्याचे सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा स्तरावर व पंचायत समिती स्तरावर नगररचना अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याबाबत व पुणे जिल्हयातील दिनांक १० फेब्रुवारी, २०१० ते ११ डिसेंबर, २०१५ या कालावधीत ग्रामपंचायत हद्दीत करण्यात आलेली अनधिकृत बांधकामे थोडासा दंड भरुन अधिकृत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) दिनांक १६ मे, २०१५ च्या अधिसुचनेद्वारे पंचायत समिती स्तरावर पदस्थापित केलेला पदसिध्द नगररचना अधिकारी म्हणून, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना

अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७) अन्वये नियुक्त केलल्या जिल्हास्तरीय नगररचना अधिकाऱ्याची आणि जिल्हा परिषदेमध्ये पदस्थापित केलेला नगररचना विभागाचा पदसिध्द जिल्हा प्रमुख महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ (१६६६ चा महा. ३७) अन्वये नियुक्त केलेल्या विभागीय सहसंचालक, नगररचना यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

पुणे जिल्ह्यामध्ये अनधिकृत बांधकामे प्रशमित करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येते.

---

**नाशिक जिल्ह्यात इंदिरा आवास रमाई घरकुल आणि अन्य योजनेतून घरे बांधण्याबाबत**

**(२३) ४३६८२ (०३-०५-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात इंदिरा आवास घरकुल व रमाई घरकुल योजना आणि अन्य योजनेतून दिनांक ३१ मार्च, २०१६ अखेर १५ हजार घरकुले बांधण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उद्दिष्ट पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) होय.

तथापि, सन २०१५-१६ वर्षामध्ये नाशिक जिल्ह्यासाठी इंदिरा आवास योजनेअंतर्गत सुधारित उद्दिष्ट ९९४८ व शबरी आवास योजनेअंतर्गत १५०५ घरकुलांचे असे एकूण ११४५३ घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.

(२) शासनाच्या दि २७ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित याद्यांना मंजूरी देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना देण्यात आले आहे.

मार्च २०१६ आखेरीस इंदिरा आवास योजनेंअतर्गत ९७३८ लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

आदिवासी विकास विभागाने दि. १५ मार्च, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये लाभार्थी निवडीबाबत सूचना दिल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे क-हाळ (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील मोकली हे गाव धर्माबाद तालुक्यात तर काऱ्हाळ हे महसूल गाव बिलोली तालुक्यात समाविष्ट करण्याबाबत**

**(२४) ४४००९ (२०-०४-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे क-हाळ (ता.बिलोली, जि.नांदेड) या गावाची मोकली काऱ्हाळ गट ग्रामपंचायतीचे तालुका पुनर्रचनेत मोकली हे गाव धर्माबाद तालुक्यात तर काऱ्हाळ हे महसूल गाव बिलोली तालुक्यात समाविष्ट करण्यात येऊन या दोन वेगवेगळ्या गावाच्या ग्रामपंचायती स्थापन करण्याची मागणी सन २००७ पासून ग्रामपंचायतीने ठराव मंजूर करुन मा.आयुक्त कार्यालय याच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास या ग्रामपंचायतीमुळे गावाच्या विकास कामाना विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) होय.

(२) नाही.

(३) दिनांक १२ फेब्रुवारी, २००४ च्या शासन निर्णयानुसार ज्या गावी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करावयाची आहे. त्या गावाची लोकसंख्या २००० असणे आवश्यक आहे. आदिवासी किंवा तांडा या भागांसाठी तसेच दोन गावांत तीन कि.मी. पेक्षा अधिक अंतर असल्यास अशा गावाची लोकसंख्या १००० असणे आवश्यक आहे. तसेच सदरील शासन निर्णयानुसार ग्रामपंचायतीची निवडणूक होऊन दोन वर्षाच्या कालावधीपर्यंत ग्रामपंचायतीचे विभाजन एकत्रिकरण / करता येत नाही. सन २०११ च्या जनगणनेनुसार काऱ्हाळ या महसुली गावाची लोकसंख्या ३८५ इतकी असून, मौ. मोकली-कऱ्हाळ या गट ग्रामपंचायतीची निवडणूक सप्टेंबर, २०१५ मध्ये झालेली आहे. शासन निर्णयातील निकषांची पूर्तता होत नसल्यामुळे मौ.मोकली-काऱ्हाळ या गट ग्रामपंचायतीचे विभाजन करुन कऱ्हाळ या महसूली गाव स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करता येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयात पंडित दिनदयाल उपाध्याय घरकुल खरेदी अर्थसहाय्य योजना सुरु करण्याबाबत**

**(२५) ४५५८२ (२५-०४-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील इंदिरा आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना व दारिद्र रेषेखालील भुमिहीन बेघर कुटुंबांना जागा खरेदी करण्यासाठी पंडित दिनदयाल उपाध्याय घरकुल खरेदी अर्थसहाय्य योजना सुरु करण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनांकडून जिल्ह्यातील २५ हजार बेघर लाभार्थ्यांना याचा लाभ मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) होय.

"पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय योजना" दि. ३०.१२.२०१५ शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आलीआहे.
(२) पंडित दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी योजनेअंतर्गत ५०० चौ.फुट जागा खरेदीसाठी रु. ५०,०००/- पर्यंत अर्थसहाय उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सन २०१६-१७ या वित्तीय वर्षासाठी रु. २५/- कोटीची अर्थसंकल्पीत तरतुद करण्यात आली असून राज्यामध्ये ५००० लाभार्थ्यांना योजनेअंतर्गत लाभ देण्यात येणार आहे.
(३) जिल्हानिहाय उद्दिष्ट कळविण्यात आले असून पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पारोळा (जि.जळगांव) येथील पंचायत समितीच्या इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(२६) ४६०६९ (२९-०४-२०१६). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारोळा, (जि.जळगांव) येथील पंचायत समितीची इमारत मोडकळीस आल्यामुळे नवीन प्रशासकीय इमारत तयार करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.ग्रामविकास मंत्री यांना पत्र दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवेदनात उपस्थित केलेल्या मुद्यांच्या संदर्भात सविस्तर वस्तुस्थिती अहवाल, रिपोर्ट, अस्तीत्वातील इमारत बांधकामाचे फोटो, इमारत बांधकाम मोडकडीस आल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र, पंचायत समिती ठराव, अस्तीत्वातील व नियोजीत बांधकाम दर्शविणारा ले-आऊट प्लॅन, जागा मालकीचा उतारा इत्यादी तपशिलासह प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला असूनही त्यावर कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) होय.
(२) पारोळा पंचायत समितीच अस्तित्वातील इमारत जुनी असल्यामुळे त्या ठिकाणी नवीन प्रशासकीय इमारत बांधकाम करण्यासाठी जिल्हा परिषद, जळगाव यांनी दिनांक २७.०६.२०१५ रोजी सादर केलेला प्रस्ताव विभागात प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

यास्तव, पारोळा पंचायत समिती नवीन प्रशासकीय इमारती बांधकामाचा परिपूर्ण प्रस्ताव आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह खास दुताकरवी शासनास सादर करण्याच्या सुचना जिल्हा परिषदेला देण्यात आल्या आहेत.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील पंचायत समिती देऊळगांव येथील सामान्य फंडची प्रकरणे प्रलंबीत असल्याबाबत**

**(२७) ४६१५५ (२५-०४-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील पंचायत समिती देऊळगांव येथील सन २०१२-१३ पुर्वी निदर्शनास आलेले सामान्य फंडची २० प्रकरणे प्रलंबीत असून एक प्रकरणाची चौकशी बाकी असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पंचायत समितीमध्ये सन २०१२-१३ पुर्वी योजनांची ११ प्रकरणे प्रलंबीत असून ४ प्रकरणाची प्राथमिक चौकशी झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१२-१३ पुर्वीची प्रकरणे असुन सुध्दा अद्यापही निकाली काढण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) हे खरे आहे.

सन २०१३-१३ पुर्वी निदर्शनास आलेल्या सामान्य फंडातील २० प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून त्यापैकी १६ प्रकरणे नस्तीबंद करण्यात आली आहेत.

उर्वरित ४ प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून वसुलीची कार्यवाही सुरु आहे.
(२) हे खरे आहे.

योजनांच्या ११ प्रकरणाची प्राथमिक चौकशी पूर्व झाली असून ७ प्रकरणे नस्ती बंद करण्यात आलेली आहे.
(३) अंशत: खरे आहे.

सन २०१२-१३ पुर्वीची संपूर्ण प्रकरणाची चौकशी पूर्ण झाली असून ३१ प्रकरणापैकी २३ प्रकरणे नस्तीबंद झाली आहेत. उर्वरित ८ प्रकरणाची वसूलीची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रकरणाची अभिलेखे प्रभारात नसणे ग्रामसेवक मयत असणे इ. बाबीमुळे विलंब झालेला आहे.

---

**चंद्रपूर जिल्ह्यात संग्राम प्रकल्पांतर्गत ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेत काम करणाऱ्या संगणक परिचालकांचे मानधन प्रलंबित असल्याबाबत**

**(२८) ४६१९५ (०३-०५-२०१६). ॲड.संजय धोटे (राजूरा), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात संग्राम प्रकल्पांतर्गत ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेत काम करणाऱ्या संगणक परिचालकांना मागील सात महिन्यापासून मानधन मिळाले नसल्यामुळे संगणक परिचालकांनी जिल्हा परिषदेसमोर मागण्यासाठी आंदोलन केल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळुन आले आहे,

(३) असल्यास, त्यानुषंगाने संगणक परिचालकांना मानधन देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

तथापि माहे ऑगस्ट २०१५ ते डिसेंबर, २०१५ या कालावधीचे मानधन थकीत असल्यामुळे संगणक परिचालकांनी (VLE) निवेदन दिले होते. त्या अनुषंगाने त्यांनी चंद्रपूर जिल्हा परिषद प्रशासनाशी चर्चा केली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरील संगणक परिचालक (VLE), तालुका / जिल्हा समन्वयक यांचे माहे डिसेंबर, २०१५ पर्यंतचा मनुष्यबळाचा संपूर्ण मोबदला महाऑनलाईन कंपनीला अदा करण्यात आलेला आहे.

ग्रामपंचायत स्तरावरील संगणक परिचालकांचा (VLE) माहे नोव्हेंबर, २०१५ पर्यंतचा मनुष्यबळाचा संपूर्ण मोबदला महाऑनलाईन कंपनीला अदा करण्यात आलेला आहे. ताळमेळाअंती माहे डिसेंबर, २०१५ चा मनुष्यबळ मोबदला अदा करण्यात येईल.

---

**अकोला जिल्ह्यात इंदिरा आवास योजनेंतर्गत सन २०१४-२०१५ करिता दारिद्र रेषेखालील लाभार्थांना घरकुलांचा लाभ मिळण्यासाठी विलंब होत असल्याबाबत**

**(२९) ४६९४६ (०३-०५-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या इंदिरा आवास योजनेअंतर्गत दारिद्र्यरेषेखालील गरिब कुटूंबाचे घरकुल योजनेअंतर्गत सन २०१४-१५ या वर्षात अकोला जिल्ह्यात ३०१४ घरकुल

बांधकामे उद्दिष्ट शासनामार्फत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणला देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरिता अकोला जिल्यातील सातही पंचायत समित्यांकडून लाभार्थ्यांचे प्रस्ताव मागविण्यात आले असता दिनांक २३ जानेवारी, २०१६ अखेर केवळ ५६९ प्रस्ताव प्राप्त झाले असून, पंचायत समिती व ग्रामसेवकांकडून लाभार्थ्यांचे प्रस्ताव सादर करण्यात न आल्याने अकोला जिल्हयात अनुदान वाटपासाठी निधी उपलब्ध असताना, २ हजार ४४५ घरकुलांची कामे प्रलंबित असल्याने, दारिद्रय रेषेखालील संबंधित लाभार्थी घरकुलांच्या लाभापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घरकुलांचा लाभ देण्यासाठी क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे प्रस्ताव सादर करण्यास विलंब झाला आहे, असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) नाही.

तथापि, सन २०१४-१५ मध्ये एकूण २६८२ घरकुलांचे उद्दिष्ट तर सन २०१५-१६ मध्ये ३४१४ घरकुलांचे उद्दिष्ट अकोला जिल्हयास प्राप्त झाले आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, सन २०१५-१६ मध्ये देण्यात आलेल्या ३४१४ उद्दिष्टापैकी दिनांक ३१ मार्च, २०१६ अखेर ३४०९ लाभार्थ्यांना प्रशासकीय मान्यता दिली आहे तसेच यापैकी ३१४१ लाभार्थ्यांना पहिला हप्ता व ९२ लाभार्थ्यांना दुसरा हप्ता अदा करण्यात आला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रेणापूर व लातूर (जि.लातुर) तालुक्यातील ग्रामीण रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(३०) ४७३९७ (०४-०५-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेणापूर व लातूर (जि.लातुर) तालुक्यातील ग्रामीण जोडरस्त्यांची दुरवस्था झाली असून वाहतुकीस गैरसोयीचे झाल्याने सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद लातूर यांनी माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान रस्त्यांची विशेष दुरुस्ती कार्यक्रम २०१५-१६ अंतर्गत प्रस्ताव कक्ष अधिकारी, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, मुंबई यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विशेष दुरुस्ती कार्यक्रमाच्या प्रस्तावास त्वरित मंजुरी देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.ग्रामविकास मंत्री महोदयाकडे दिनांक २१ जुलै, २०१५ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्ते दुरुस्तीच्या कामास शासनास किती कालावधी लागेल,
(४) तसेच सदर रस्ते दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :**(१) व (२) होय हे खरे आहे.
(३) व (४) सन २०१५-१६ अंतर्गत रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत लातूर जिल्हयातील कामांना निधी उपलब्धतेची मर्यादा लक्षात घेवून लातूर तालुक्यातील रु. १३६.०० लक्ष रु११४.५७ लक्षच्या कामांना मंजूरी देण्यात आलीआहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रेणपूर व औसा (जि.लातुर) तालुक्यातील ग्रामीण जोडरस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(३१) ४७६१४ (३०-०४-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेणपूर व औसा (जि.लातुर) तालुक्यातील ग्रामीण जोडरस्त्यांची दुरवस्था झाल्याने सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, लातुर यांनी रस्त्यांची विशेष दुरुस्ती कार्यक्रम २०१५-१६ अंतर्गत प्रस्ताव ग्रमाविकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान सादर केला असून अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाबाबत स्थानिक लोप्रतिनिधी दिनांक २१ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास प्रस्तावास मान्यता देण्याबाबत मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावास मंजूरी मिळण्याबाबत व रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) ते (३) सन २०१५-१६ अंतर्गत रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत लातूर जिल्हयातील कामांना निधी उपलब्धतेची मर्यादा लक्षात घेवून रेणापूर तालुक्यातील रु११४.५७ लक्षच्या कामांना मंजूरी देण्यात आली आहे. जिल्हा परिषदेने रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०१५-१६ साठी सादर केलेल्या मूळ प्रस्तावामध्ये औसा तालुक्यातील कामांचा समावेश केलेला नाही.

तसेच जिल्हा परिषद लातूर यांच्याकडून प्राप्त अतिरिक्त प्रस्तावांना निधी अभावी मंजूरी देता आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया जिल्हयातील जिल्हा परिषदेसाठी जलशुध्दीकरण**
**यंत्राच्या खरेदीसाठी निविदा देण्याबाबत**

**(३२) ४८१०९ (३०-०४-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील जिल्हा परिषद सन २०१३-१४ मध्ये जलशुध्दीकरण यंत्र खरेदीकरिता मंजूर करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खरेदीकरिता ३ वेळा निविदा रद्द करण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१५ मध्ये ज्यांची निविदा रद्द करण्यात आली त्याच ठेकेदारांना पुन्हा टेंडेर देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(५) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) व (२) नाही.

(३) होय.

निविदा भरणाऱ्यांनी निविदेच्या अटी व शर्तीची पुर्तता केल्यानंतर, विहीत कार्यवाही पूर्ण झाल्यावर पात्र निविदाधारकास पुरवठा आदेश देण्यात आले.

(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई गोवा महामार्गाकडून गावडेवाडी चिदरकरवाडी (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) ते**
**ग्रामपंचायतीपर्यंतच्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(३३) ४८१२५ (२५-०४-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंगुळी ग्रामपंचायतीने (ता.कुडाळ, जि.सिंधुदूर्ग) नागरी सुविधा योजनेतून मुंबई गोवा महामार्गाकडून गावडेवाडी चिदरकरवाडी ते ग्रामपंचायतीपर्यंत केलेल्या रस्त्याच्या कामात खडी माती मिश्रित असून साहित्य पूर्णपणे निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निकृष्ट कामाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, .चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

पिंगुळी मोडकावड ते गावडेवाडी चिदरकरवाडी रस्ता खडीकरण व डांबरीकरण करण्याचे काम नागरी सुविधा योजनेमधून पूर्ण करण्यात आले आहे. ग्रामपंचायत पिंगुळी यांनी मक्त्याने घेतलेल्या सदरच्या कामासाठी आवश्यक साहित्य कामाच्या जागेवर गोळा केल्यानंतर शासकीय प्रयोगशाळेमध्ये गुणवत्ता तपासणी करण्यात आलेली असून, प्रयोगशाळेकडून प्राप्त झालेले तपासणी अहवाल समाधानकारक आहेत. सदरील काम डिसेंबर, २०१५ मध्ये पूर्ण करण्यात आले असून, कामाकरिता वापरण्यात आलेली खडी माती मिश्रित असणे अथवा बांधकाम साहित्य निकृष्ट दर्जाचे असण्याची कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वेर्ले (ता.सावंतवाडी) येथे तेराव्या वित्त आयोगातून मिळालेला पर्यावरण निधीचा अपहार झाल्याबाबत

**(३४) ४८१६५ (२९-०४-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेल्या दोन वर्षात काहीही कामे न करता तेराव्या वित्त आयोगातून मिळालेला पर्यावरण निधीचा अपहार करण्यात आल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पर्यावरण निधीतील निधी एका व्यक्तींच्या नावे ४ लाख २८ हजार रक्कम परस्पर बळकावण्यात आली तर पाणीपुरवठा स्वच्छता समितीच्या १३ लाख ३८ हजारापैकी १ लाख ३८ हजार रुपये व मागासवर्गीय निधीही बळकावण्यात आल्याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी मा.मंत्री महोदयांना निवेदन देऊन सदर बाब निदर्शनास आणलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने अपहारप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तद्‌नुसार या प्रकरणी दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

याबाबत स्थानिक नागरीकांकडून निवेदन गटस्तरावर प्राप्त झाले आहे. सदर निवेदनामध्ये प्रत मा.पालकमंत्री यांना देण्यात आले बाबत नमूद आहे.

(३) सदर अपहार प्रकरणी गट स्तरावरुन चौकशी करण्यात आली आहे. या चौकशी दरम्यान गैरव्यवहार अपहार तसेच अनियमितता झाली असल्याचे आढळून आले आहे.

(४) सदर चौकशीनंतर प्रथम दर्शनी ग्रामसेवक दोषी असल्याचे आढळून आले असल्याने तातडीची कारवाई म्हणून तत्कालीन ग्रामसेवक यांना निलंबित करण्यात आलेले आहे.

तसेच उक्त प्रकरणी सरपंच, उपसरपंच आणि सदस्य दोषी असल्याचे आढळून आल्याने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ३९(१) नुसार अपात्रतेची कारवाई विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे प्रस्तावित करण्यात आलेली आहे.
(५) अशी बाब नाही.

---

**मलकापूर तालुक्यातील दादगाव ते भोटा मार्गाचा रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३५) ४८४७५ (०६-०५-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर मतदार संघातील दादगाव ते भोटा हा एकूण २ कि .मी.लांबीच्या रस्ताची दुरवस्था झाली असून या रस्त्यावरून दुचाकी, चारचाकी वाहन धारकांना, शेतकरी व ग्रामस्थांना गैरसोईचे होत असल्याची बाब माहे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या मातीकाम व खडीकरणासाठी ६० लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यकता असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता, जि.पं.बांधकाम विभाग बुलढाणा याना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. तथापि सदर रस्त्यावरुन वाहतुक वर्दळ सुरु आहे.
(३) जिल्हा परिषदेकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(४) व (५) मलकापूर मतदार संघातील दादगांव ते भोटा हा रस्ते विकास योजना सन २००१-२०२१ नुसार इतर जिल्हा मार्ग क्र. ५४ चा भाग रस्ता आहे. सदर रस्त्याची लांबी २.०० कि.मी. आहे. या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहिल.

---

**मलकापूर तालुक्यातील दहीगाव ते नांदुरा रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३६) ४८४७६ (०६-०५-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर मतदार संघातील दहिगाव ते नांदुरा हा एकूण २ कि .मी.लांबीच्या रस्त्याची दुरवस्था झाली असून या रस्त्यावरून दुचाकी, चारचाकी वाहन धारकांना, शेतकरी व ग्रामस्थांना गैरसोईचे होत असल्याची बाब माहे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे डांबरीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या डांबरीकरण व नूतनीकरणासाठी ५० लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यकता असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता जि.पं.बांधकाम विभाग बुलढाणा याना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. तथापि सदर रस्त्यावर वाहतुक वर्दळ सुरु आहे.
(३) जिल्हा परिषदेकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(४) व (५) मलकापूर मतदार संघातील दहिगांव ते नांदूरा रस्ते विकास योजना सन २००१-२०२१ नुसार इतर जिल्हा मार्ग क्र. ३९ चा भाग आहे. या रस्त्याची लांबी ५.०० कि.मी. असून रस्ता डांबरी पृष्ठभागाचा आहे.

जिल्हा वार्षिक योजना सन २०१५-१६ अंतर्गत ३/०० ते ४/०० कि.मी. लांबीतील डांबरी नुतनीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत प्रगतीत आहे.

उर्वरित खराब रस्त्याच्या दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहिल.

---

**मलकापूर तालुक्यातील शिरसोडी ते चांदूर बिस्वा रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३७) ४८४७७ (०६-०५-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर मतदार संघातील शिरसोडी ते चांदूर बिस्वा हा एकूण २ कि .मी.लांबीच्या रस्त्याची दुरवस्था झाली असून या रस्त्यावरून दुचाकी, चारचाकी वाहन धारकांना, शेतकरी व ग्रामस्थांना गैरसोईचे होत असल्याची बाब माहे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या मातीकाम व खडीकरणासाठी ७० लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यकता असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता, जि.पं.बांधकाम विभाग बुलढाणा याना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. तथापि सदर रस्त्यावर वाहतुक वर्दळ सुरु आहे.
(३) जिल्हा परिषदेकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(४) व (५) मलकापूर मतदार संघातील शिरसोडी ते चांदुरबिस्वा हा रस्ते विकास योजना सन २००१-२०२१ नुसार इतर जिल्हा मार्ग क्र. ४० चा भाग रस्ता असून या रस्त्याची लांबी ३.०० कि.मी. आहे.

जिल्हा वार्षिक योजना सन २०१५-१६ अंतर्गत ०/०० ते १/७०० कि.मी. लांबीतील रस्त्याचे खडीकरण डांबरीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मंजूर असून निविदा स्तरावर आहे.

उर्वरित लांबीतील रस्ता दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहिल.

---

### मलकापूर तालुक्यातील पातोंडा ते अलमपूर रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(३८) ४८४७८ (०६-०५-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर मतदार संघातील पातोंडा ते अलमपूर हा एकूण ३ कि.मी. लांबीच्या रस्त्याची दुरवस्था झाली असून या रस्त्यावरून दुचाकी, चारचाकी वाहन धारकांना, शेतकरी व ग्रामस्थांना गैरसोईचे होत असल्याची बाब माहे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे डांबरीकरण व नुतनीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या डांबरीकरण व नुतनीकरणासाठी ७० लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यकता असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता, जि.पं.बांधकाम विभाग बुलढाणा याना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-१०-२०१६) :** (१) ते (५) जिल्हा परिषदेकडे प्रश्नांकिंत रस्त्याबाबत निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. मलकापूर मतदार संघातील पातोंडा ते अलमपूर हा रस्ता रस्ते विकास योजना सन २००१-२०२१ नुसार इतर जिल्हा मार्ग क्र. ४१ चा भाग रस्ता असून त्याची लांबी ३.६०० कि.मी. आहे. सदर रस्ता डांबरी पृष्ठभागाचा आहे.

जिल्हा वार्षिक योजना सन २०१५-१६ अंतर्गत ०/०० ते २/६०० कि.मी. लांबीतील डांबरी नुतनीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पूर्ण केले आहे.

उर्वरित लांबीतील दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहिल.

---

**मलकापूर तालुक्यातील दहिवडी ते रामा.६ रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३९) ४८४८० (०६-०५-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर मतदार संघातील दहिवडी ते रामा.६ हा एकूण १ कि .मी.लांबीच्या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे रस्त्यावरून दुचाकी, चारचाकी वाहन धारकांना तसेच शेतकरी व ग्रामस्थांना आवागमन करणे गैरसोईचे झाले असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे डांबरीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या डांबरीकरणासाठी ३५ लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यकता असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता, जि.पं.बांधकाम विभाग बुलढाणा याना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. तथापि सदर रस्त्यावर वाहतुक वर्दळ सुरु आहे.

(३) जिल्हा परिषदेकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) व (५) मलकापूर मतदार संघातील दहिवडी ते रामा ६ हा रस्ते रसते विकास योजना सन २००१-२०२१ नुसार इतर जिल्हा मार्ग क्र. ४२ चा भाग रस्ता असून सदर रस्त्याची लांबी १.५० कि.मी. आहे.

जिल्हा वार्षिक योजना सन २०१५-१६ अंतर्गत सदर रस्त्याच्या ०/०० ते ०/८०० कि.मी. लांबीतील डांबरी नुतनीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मंजूर असून निविदा स्तरावर आहे. उर्वरित रस्ता वाहतुकीस योग्य आहे.

---

**मलकापूर तालुक्यातील माळेगाव ते खडपगाव रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४०) ४८४८१ (०६-०५-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर मतदार संघातील माळेगाव ते खडपगाव हा एकूण २ कि .मी.लांबीच्या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे रस्त्यावरून दुचाकी, चारचाकी वाहन धारकांना तसेच शेतकरी व ग्रामस्थांना गैरसोईचे झाले असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ वा त्यादरम्यान मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे डांबरीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या डांबरीकरणासाठी ४० लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यकता असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता, जि.पं.बांधकाम विभाग बुलढाणा याना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. तथापि सदर रस्त्यावर वाहतुक वर्दळ सुरु आहे.
(३) जिल्हा परिषदेकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(४) व (५) मलकापूर मतदार संघातील माळेगांव ते खडदगाव हा रस्ता सन २००१-२०२१ च्या रस्ते विकास आराखड्यानुसर इतर जिल्हा मार्ग क्र. ४५ चा भाग रस्ता असून सदर भाग रस्त्याची लांबी २.०० कि.मी. आहे.

सदर रस्त्याच्या डांबरीनुतनीकरणाचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषास अधिन राहून प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहिल.

---

### मलकापूर तालुक्यातील धानोरा ते काटी रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(४१) ४८४८२ (०६-०५-२०१६). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर मतदार संघातील धानोरा ते काटी हा एकूण १ कि .मी.लांबीचा रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे रस्त्यावरून दुचाकी, चारचाकी वाहन धारकांना तसेच शेतकरी व ग्रामस्थांना आवागमन करणे गैरसोईचे झाले असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खर आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे डांबरीकरण व नुतनीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रस्त्याच्या डांबरीकरण व नुतनीकरणासाठी २५ लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यकता असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता, जि.पं.बांधकाम विभाग बुलढाणा याना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. तथापि सदर रस्त्यावर वाहतुक वर्दळ सुरु आहे.

(३) जिल्हा परिषदेकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) व (५) मलकापूर मतदार संघातील धानोरा ते काही हा रस्ता रस्ते विकास योजना सन २००१-२०२१ नुसार इतर जिल्हा मार्ग क्र. ३३ चा भाग रस्ता आहे. सदर रस्त्याची लांबी ३.६० कि.मी. असून संपूर्ण लांबी डांबरी पृष्ठभागाची आहे.

जिल्हा वार्षिक योजना सन २०१५-१६ अंतर्गत या रस्त्याच्या ०/०० ते १/०० कि.मी. लांबीतील डांबरी नुतनीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मंजूर असून निविदा स्तरावर आहे. उर्वरित रस्ता चांगल्या स्थितीत आहे.

---

**महसूल नुकसानीपोटी अकोला जिल्ह्यातील गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोला, यांना जिल्हाधिकारी अकोला यांच्याकडून २२ लाख रुपयाच दंड लावल्याबाबत**

**(४२) ४८५२६ (१७-०५-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या महसूल नुकसानीपोटी अकोला जिल्ह्यातील गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोला, यांना जिल्हाधिकारी अकोला यांच्या कडून २२ लाख रुपयांचा दंड लावण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास या कंत्राटदाराच्या देयकातून स्वामित्व धनाची रक्कम कपात न करणे, स्वामित्व धनाच्या तसेच गौण खनिज वापराच्या पावत्या देयका सोबत न जोडणे असा गंभीर प्रकार निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने महसूल बुडविण्याऱ्या जबाबदार अधिकारी/कंत्राटदारावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०६-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे. जिल्हाधिकारी, अकोला यांनी नियुक्त केलेल्या चमुने माहे जानेवारी, २०१६ मध्ये ग्रा.पं. मार्फत पुर्ण केलेल्या १३ व्या वित्त आयोग व दलीत वस्ती सुधार योजनेअंतर्गत कामाच्या नस्तीची तपासणी केली असता प्रथम दशर्नी दोषी आढळलेल्या ग्राम पंचायतीवर स्वामित्वधनापोटी रु.४०,८१,३३७/- रुपये दंड आकारला आहे.

(२) अंशतः खरे आहे. काम करणारी एजन्सी ग्रामपंचायत असल्याने देयकांचे अनुदान हे कंत्राटदारास वितरीत न करता संबंधित ग्रामपंचायतीला वितरीत करण्यात आले आहे. एकूण ३२ ग्रामपंचायतीमधील ७२ कामावरील स्वामित्वधनाची रु.४,७२,२३५/- इतकी रक्कम कपात करणे आवश्यक होती. त्यापैकी जोडण्यात आलेले वाहतुक पासेस ग्राह्य धरुन रु.१,९५,०५०/- इतकी रक्कम कपात करण्यात आली आहे. उर्वरित रु.२,७७,१८५/- रकमेची वसुली बाकी आहे.

(३) व (४) याबाबत जिल्हाधिकारी, अकोला यांच्या निर्देशानुसार तहसिलदार, अकोला यांच्या पथकामार्फत केलेल्या चौकशीमध्ये काम करणारी एजन्सी ग्रामपंचायत असल्याने ३२ ग्रामपंचायतींचे ७२ कामातील स्वामित्वधनाची दंडासह एकूण रु.४०,८१,३३७/- इतकी रक्कम वसूल करुन शासनखाती जमा करणेबाबत तहसिलदार, अकोला यांनी आदेश निर्गमित केले आहेत. सदर रक्कम वसूलीच्या नोटीसा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अकोला यांचेमार्फत संबंधित ग्रामपंचायतींना बजावण्यात आल्या असून त्यांचा खुलासा मागविण्यात आला आहे.
(५) ग्रामपंचायतींनी दंडाची रक्कम माफ करण्याबाबत उपविभागीय अधिकारी (महसूल) अकोला यांचेकडे दिलेले अपील अर्ज पंचायत समिती रस्तरावरुन दि.५.५.२०१६ च्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी यांचेकडे दाखल करण्यात आलेले आहेत. अपीलामधील अंतिम निर्णय प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

---

**बुलढाणा तालुक्यातील ग्रामिण रस्ता क्र. २१ दरम्यानच्या घाटाच्या चढमुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(४३) ४८६१४ (०६-०५-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा तालुक्यातील दहीद बु. व दहीद खु. ग्रामिण रस्ता क्र. २१ दरम्यानचा घाटाचा चढ शासकीय नियमांना अनुसरून मापदंडाने बांधलेला आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात स्थानिक नागरिकांच्या गैरसोईबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत काय व त्यांची चौकशी करण्यात आली काय,
(३) असल्यास, चौकशीच्या निष्कर्षाच्या अनुषंगाने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) नाही.
(२) होय, जिल्हा परिषदेमार्फत सर्वेक्षण करण्यात आले आहे.
(३) व (४) घाट सुधारणा करण्याची आवश्यकता असून जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत काम अंतर्भूत करुन निधीच्या उपलब्धतेनुसार काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

---

**औरंगाबाद शहरातील चिखलठाणा येथील पिसादेवी झालर क्षेत्रात ग्रामसेवकाने विकासकांना सिडकोचे नाहरकत प्रमाणपत्र व अकृषक परवाना नसतांना विकासकांना परवानगी दिल्याबाबत**

**(४४) ४८९५२ (३०-०४-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील चिखलठाणा येथील पिसादेवी झालर क्षेत्रात अनेक विकासक ग्रामपंचायतीकडे बांधकाम कामासाठी दाखल केलेले प्रस्ताव सिडकोने नाहरकत प्रमाणपत्र न घेता व जिल्हा प्रशासनाचा अकृषक परवाना नसतानांही ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकांने आर्थिक देवाणघेवाण करून विकासकांना दिल्याबाबत ९ विकासकांवर फौजदारी गुन्हे दिनांक २८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास दाखल करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामसेवकाने सदर विकासकांना सिडकोचे नाहरकत प्रमाणपत्र व अकृषक परवाना नसतांना विकासकांना परवानगी दिल्याबाबत ग्रामसेवकांवर प्रशासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) होय. सिडको कार्यालय, औरंगाबाद यांनी संबंधित विकासकांवर फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत.
(२) व (३) ग्रामपंचायत पिसादेवीचे ग्रामसेवक यांनी ग्रामपंचायतीच्या मासिक सभेच्या कार्यवृत्तांतामध्ये लिखीत स्वरुपात सिडको हद्दीतील मालमत्तांना व अकृषक नसलेल्या बांधकामांना परवानगी देता येत असल्याबाबत मत नोंदवीले आहे. असे असले तरी ग्रामपंचायत कार्यकारीणी तसेच सरपंच यांनी परवानगी देणेबाबत ठराव संमत केल्यामुळे अशा प्रकारे परवानगी देण्यात आल्या आहेत. याबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद यांनी संबंधित ग्रामसेवक यांना कारणे दाखवा नोटिस बजावली आहे.

---

## खुलताबाद (जि.औरंगाबाद) मधील इंदिरा आवास घरकुल योजनेच्या कामात होत असलेली अनियमितता

**(४५) ४९०८२ (२५-०४-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खुलताबाद (जि.औरंगाबाद) मधील इंदिरा आवास घरकुल योजनेच्या कामात अनियमितता व कार्यशाळेस गैरहजर असणाऱ्या १६ ग्रामसेवकांविरुध्द कारवाई करण्याचा निर्णय अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी दिनांक १२ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इंदिरा आवास घरकुल योजनेत सन २०१५-१६ पूर्वी मंजूर झालेल्या लाभार्थांची घरकुले अद्याप पूर्ण झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर घरकुले किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार असून त्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) होय.
तथापि, कार्यशाळेस गैरहजर असणाऱ्या ग्रामसेवकांवर कारवाई करण्याबाबत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी दिलेल्या तोंडी सूचनेनुसार गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खुलताबाद यांनी दि.१२/०१/२०१६ रोजी सर्व ग्रामसेवकांना कारणे दाखवा नोटीस बजावली असून खुलासा मागितला आहे. तसेच सर्व ग्रामसेवकांना सक्त ताकीदही देण्यात आली आहे.
(२) होय.
पाणी टंचाईमुळे काही घरकुले अपूर्ण आहेत. त्याचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे.

| सन | घरकुले | | |
|---|---|---|---|
| | एकूण मंजूर | पुर्ण | अपूर्ण |
| २०१२-१३ | १३४ | ११९ | १५ |
| २०१३-१४ | ३१७ | २८९ | २८ |
| २०१४-१५ | १६७ | १४८ | १९ |

(३) सदर घरकुले जुलै, २०१६ पर्यंत पूर्ण करण्यात येणार असून त्यासाठी पंचायत समिती स्तरावर लाभार्थ्यांची कार्यशाळा घेऊन घरकुल पूर्ण करण्यासाठी पाठपूरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी तालुक्यातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(४६) ४९२७० (०५-०५-२०१६). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी तालुक्यातील शहापूर, आर्वी, वाडी, तुळजापूर, गोविंदपूर, इस्माईलपूर, तारांगपूर, दिग्रज, कुंभारी बाजार इत्यादी अनेक रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर खड्ड्यांमुळे नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्यावरील खड्डे भरून रस्त्यावरील वाहतूक सुरुळीत होण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-०९-२०१६) :** (१) ते (४) अंशतः खरे आहे. जिल्हा परिषदेकडील मैलमजूरांमार्फत रस्त्यांवरील खड्डे भरुन रस्ते सुस्थितीत ठेवण्याचा प्रयत्न जिल्हा परिषदेमार्फत सुरु आहे.

प्रश्नांकित रस्त्यांपैकी शहापूर-आर्वी-कुंभारी इ.जि.मा. क्र.३४ व आर्वी-डिग्रस इ.जि.मा.क्र. ३३ हे वाहतुकीस योग्य आहेत. शहापूर-तुळजापूर ग्रामा क्र.१० चे काम ३०५४ रस्ते व पुल दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत मंजूर आहे. आर्वी-ईस्माईलपूर-सारंगपूर-गोंविदपूर ग्रामा क्र.१३ चे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत सन २०१६-१७ मध्ये प्रस्तावित आहे.

रस्ते लांबीच्या प्रमाणात विभागास उपलब्ध होणारा निधी अत्यंत अल्प आहे. याउलट शासन स्तरावर प्राप्त होणाऱ्या मागण्या जास्त आहेत. उर्वरीत इजिमा ३४ ते जुळजापूर ग्रामा क्र.९ गोविंदपूर-कुंभारी ग्रामा.११ व कुंभारी-डिग्रस ग्राम क्र.१४ या रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या टप्प्याने प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहिल.

---

**संगमेश्वर (जि.रत्नागिरी) या तालुक्यातील मौजे गोताडवाडी ते जिल्हापरिषद मराठी शाळा ग्रामदेवता मंदिराच्या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४७) ४९६५१ (३०-०४-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) या तालुक्यातील मौजे गोताडवाडी ते जिल्हापरिषद मराठी शाळा ग्रामदेवता मंदिर या सुमारे अडीच कि.मी. अंतराच्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरणासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी व नागरीकांनी संबंधितांकडे मागणी करण्यात येऊनही अद्यापी निधी उपलब्ध करण्यात आला नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी. इतकी असून अस्तित्वातील लांबी १९०९५५.२२ कि.मी. इतकी आहे.

सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या व मानव विकास निर्देशकांच्या प्रमाणात करण्यात येते. त्यानुसार रत्नागिरी जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ८०८५.३५ कि.मी. इतकी असून अस्तित्वातील लांबी ६४४१.११ कि.मी. इतकी आहे. रस्ते व पूल, दुरुस्ती व परीरक्षण या कार्यक्रमाअंतर्गत सन २०१२-१३ ते २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेस एकूण रु. ४३५७.१७ लक्ष, तेराव्या वित्त आयोगामध्ये सन २०१२-१३ ते २०१४-१५ मध्ये एकूण रु. ७६३.५८ लक्ष तर पूरहानी कार्यक्रमासाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेला रु. १७००.६३ लक्ष असा एकूण रु. ६८२१.३८ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

रस्ते लांबीच्या प्रमाणात विभागास उपलब्ध होणारा निधी अत्यंत अल्प आहे याउलट शासन स्तरावर प्राप्त होणाऱ्या मागण्या जास्त आहेत.

प्रश्नांकित गोताडवाडी जि.प.मराठी शाळा ते ग्रामदेवता मंदिर या रस्त्याची लांबी तीन रस्त्यामध्ये अंतभूत आहे. त्यापैकी करंबेळे गावची गोताडवाडी खंडागळेवाडी ते कनकाडी येरंडेवाडी ग्रामीण मार्ग क्र.२११ व मेघी कनकाडी वांझोळे बावनदी कासार कोळवण कोंड्ये निवधे कळकदरा इतर जिल्हा मार्ग क्र. ९२ या रस्त्याची कामे जिल्हा वार्षिक योजना सन २०१६-१७ अंतर्गत प्रस्तावित आहेत. व उर्वरित करंबेळे गावची धावडेवाडी झोरेवाडी मिरगळवाडी ते इजिमा क्र. ९२ ग्रामीण मार्ग क्र.२१२ या रस्त्याचे काम अर्थसंकल्पात / रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न राहिल.

---

**नांदेड जिल्हा परिषद शिक्षण विभागात झालेल्या बनावट व नियम बाह्य बदल्यांबाबत**

**(४८) ४९७५८ (३०-०४-२०१६). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हा परिषद शिक्षण विभागात बनावट व नियम बाह्य बदल्यांचे सन २०१४ मध्ये ३२ प्रकरणे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी नेमलेल्या चौकशी समितीच्या ४ अहवालावरुन व विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचे आदेश आणि जिल्हापरिषद नांदेड विधीज्ञ पॅनलचे अभिप्रायानुसार कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणामध्ये ज्या शिक्षक स्विय सहाय्यकांनी असे बनावट व नियमबाहय आदेश काढले अशा तत्कालीन जिल्हापरिषदेचे पदाधिकाऱ्यांच्या सांगण्यावरुन व त्यांचे प्रतिनिधी म्हणून अधिकाराचा वापर केला असल्याने तत्कालीन जि.प.पदाधिकाऱ्यांना सहआरोपी करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(५) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) नांदेड जिल्हा परिषद शिक्षण विभागात सन २०१४ मध्ये बनावट व नियमबाहय बदल्यांची एकुण ४४ प्रकरणे अद्यापपर्यंत निदर्शनास आली आहेत.

(२) या प्रकरणात विविध टप्प्यावर कार्यवाही सुरु आहे.

(३), (४), (५) व (६) विभागीय आयुक्त कार्यालयाने केलेल्या चौकशीनुसार २४ कर्मचाऱ्यांविरुध्द निलंबनाची कार्यवाही करण्यात आली असून १३ कर्मचाऱ्यांविरुध्द पोलिस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल केलेले आहेत. तथापि, जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांना सहआरोपी करण्याबाबतचा निर्णय पोलीस विभागाने घ्यावयाचा आहे.

---

**सावली (जि.चंद्रपुर) तालुक्यातील खेड्यापाड्यात गावे जोडण्याकरिता कच्च्या रस्त्यांना पक्के रस्ते बनविण्याचे सुरु असलेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(४९) ५०१९६ (२५-०४-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावली (जि.चंद्रपुर) तालुक्यातील खेड्यापाड्यात गावे जोडण्याकरिता कच्च्या रस्त्यांना पक्के रस्ते बनविण्याचे सुरु असलेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याच्या तक्रारी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच निमगाव-पाथरी रस्त्याचे कामही निकृष्ट दर्जाचे झाले असून यांची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्ते दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०९-२०१६) :** (१) निमगाव-पाथरी या इतर जिल्हा मार्ग क्र. ११२ बाबत तक्रार प्राप्त झाली होती.

(२) तक्रारीच्या अनुषंगाने कामाची जिल्हा परिषदेमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(३) निमगाव-पाथरी रस्त्याचा सरफेस ड्रेसिंगचा पृष्ठभाग काही ठिकाणी अंशत: खराब झाला होता तो, अंतिम देयक अदा करण्यापुर्वी, कंत्राटदाराकडून दुरुस्त करुन घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इंदिरा आवास योजने अंतर्गत येवला (जि.नाशिक) तालुक्यातील ३४९१ दारिद्र्यरेषेखालील वंचित लाभार्थ्यांच्या घरकुल प्रस्तावास मंजुरी मिळण्याबाबत**

**(५०) ५०४६६ (०६-०५-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदिरा आवास योजने अंतर्गत येवला (जि.नाशिक) तालुक्यातील ३४९१ दारिद्र्यरेषेखालील वंचित लाभार्थ्यांच्या घरकुल प्रस्तावास मंजुरी मिळणेसाठी जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक ११ जानेवारी २०१६ रोजी वा त्यासुमारास बैठक घेतली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव मंजुरीसाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ नोव्हेंबर २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या मंजुरीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१६) :** (१) व (२) होय.
(३) उक्त प्रस्तावातील ३४९१ लाभार्थ्यांचा समावेश इंदिरा आवास योजनेच्या मूळ प्रतिक्षा यादीत नसल्याने त्यांना घरकुलांचा लाभ देण्यात आला नाही.

तथापि, शासनाच्या दि. २७ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन परिपत्रक क्रमांक इंआयो-२०१६/प्र.क्र..४१/ योजना-१० अन्वये इंदिरा आवास योजनेअंतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अल्पसंख्याकाच्या बेघर/ कच्चे घर असलेल्या कुटुंबाची याद्या सुधारित करण्याचे अधिकार विभागीय आयुक्ताएवजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना देण्यात आले आहे.

उपरोक्त शासन परिपत्रकानुसार येवला तालुक्यातील ६४७ लाभार्थ्यांचा समावेश सुधारित प्रतिक्षा यादीत केला असून २७० लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.